वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी-४३१ ४०२
Web.http://www.vnmkv.ac.in meal. reg_mau@rediffmail.com fax. ०२४५२-२२३६५५,२२३५८२


# २७ वा दीक्षांत समारंभ

## जाहीर प्रगटन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा २७ वा दीक्षांत समारंभ दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात सकाळी ११.०० वाजता आयोजीत करण्यात येणार आहे. मा. कुलपती महोदय तथा मा. राज्यपाल महोदय, महाराष्ट्र शासन श्री आचार्य देवव्रत हे दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भुषवतील तर प्रतिकुलपती तथा मा. मंत्री कृषि महाराष्ट्र शासन श्री दत्तात्रय भरणे हे दीक्षांत समारंभास सन्मानित अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या दीक्षांत समारंभात डॉ. मंगला राय, माजी महासंचालक, भारतीय कृषि अनुसंधान परिषद आणि माजी सचिव, कृषि अनुसंधान व शिक्षण विभाग, भारत सरकार हे दीक्षांत समारंभास प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित राहुन दीक्षांत अभिभाषण करणार आहेत. दीक्षांत समारंभात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी पूर्ण करणा-या स्नातकांना पदवी अनुग्रहीत करण्यात येणार आहे. पदवी अनुग्रहीत करण्यात येणा-या स्नातकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. दीक्षांत समारंभाच्या यादीत नाव असणा-या स्नातकांनीच कार्यक्रमास उपस्थित राहावे असे मा. कुलसचिव, वनामकृवि, परभणी यांनी कळविले आहे.

विद्यापीठातील विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी तसेच इतर मान्यवरांनी विद्यापीठाचा २७ वा दीक्षांत समारंभ आभासी पध्दतीने प्रसार माध्यमावर पहावा असे प्रा. (डॉ.) इन्द्र मणि, मा. कुलगुरु महोदय, वनामकृवि, परभणी यांनी नमुद केले आहे. सदर कार्यक्रमाची वेब लिंक विद्यापीठ संकेतस्थळावर दोन दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात येईल. ज्या पदवीधरांची नावे विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसुचनेत सुचिबध्द असतील त्यांनाच दीक्षांत दिंडीत सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल. दीक्षांत समारंभास उपस्थित असलेल्या स्नातकांना समारंभानंतर पदवी प्रमाणपत्रे देण्यात येतील व उर्वरीत स्नातकांना त्या दिवशी त्यांच्या संवंधीत महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात येतील.

दीक्षांत समारंभ वेळेवर सुरु होणार असल्यामुळे सर्व संबंधीत स्नातकांनी वेळेच्या एक तास अगोदर विद्वत दिंडीत सहभागी होण्यासाठी कार्यक्रम स्थळी यावे तसेच विद्यार्थ्यांनी व अधिकारी, कर्मचारी व प्राध्यापक वृंद यांनी पांढरा कुर्ता पायजामा व विद्यार्थीनी व महिला अधिकारी, कर्मचारी यांनी क्रीम कलरची साडी व ब्लाऊज परिधान करावेत. विद्यावस्त्रे दीक्षांत समारंभाच्या एक दिवस अगोदर किंवा समारंभाच्या दिवशी सकाळी नऊ च्या आत संबंधीता कडून प्राप्त करावीत.

(संतोष वेणीकर)
**कुलसचिव**

जा. क्र.२०२५/जा.प्र./२७ वा दी.स./विद्या-३
दिनांक : ०७ डिसेंबर २०२५

Scanned with OKEN Scanner